# सेंद्रिय शेती काळाची गरज

**कु. पल्लवी चिंचवडे**
कृषी पदवीधर विद्यार्थिनी
कृषी महाविद्यालय, परभणी
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

आपण पाहतोच कि, नवनवीन आजारांनी माणसाला जखडून टाकले आहे. पूर्वी माणूस १०० वर्षे जगायचा. आता त्याच आयुष्यही अर्ध्या शतकावर आल आहे. कोरोनाच्या काळात जगभर कशी दहशत माजली होती हे आपण जाणताच. या काळानंतर माणूस अयोग्याकडे आधी पेक्षा जरा जास्त लक्ष द्यायला लागला आहे. बाजारातून भाजीपाला खरेदी करताना १० वेळा विचार करतो कि हा भाजीपाला कसा पिकवला असेल, यात किती रसायन असतील, हा विषमुक्त असेल का? हे खाऊन मला त्रास तर होणार नाही ना इ. अनेक प्रश्नांनी डोक भंडावून जात. हाच भाजीपाला जर खात्रीशीर रसायनमुक्त, विषमुक्त मिळाला तर ? अधिक किंमत मोजावी लागली तरी मी ते खरेदी करेन असा आजच्या जगातील कुठलाही सद्गृहस्थ म्हणेल.

१९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. त्यांनतर १९६६ ला हरितक्रांतीची सुरवात झाली. वाढत्या लोकसंखेला वाढीव अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी सुधारित वाण आणि भरमसाठ रसायने वापरून आपण हि गरज पूर्ण करू लागलो ते आतापर्यंत. त्यामुळे जमिनीचा कस पूर्णपणे घसरलाय, जमीन नापीक बनत चाललीये. याच पद्धतीने शेती करत राहिलो तर येणाऱ्या काही दशकांत आपल्याला फक्त रसायनच खावी लागतील. हे रसायनमुक्त आपण याधीही उगवत होतो आपल्या आजोबा-पणजोबांच्या काळात मग आता कुठ गेल हे सगळ? तर माणसाने स्वतःच्या स्वार्थासाठी पर्यावरणाचे संतुलन बिघडवून रासायनिक शेती केल्यामुळे काळाच्या ओघात कमी होत गेल.

मग विषमुक्त, रसायनमुक्त खाण्यासाठी, जमिनीचा पोत टिकून ठेवण्यासाठी, शाश्वतता राखण्यासाठी, माणसाचे, पर्यावरणाचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी आपल्याला रसायनमुक्त शेती करावी लागेल. रसायनमुक्त कस उगवायच? त्याच तंत्रज्ञान काय हे सगळ आपण या लेखात आणि क्रमशः येणाऱ्या लेखांत पाहणार आहोत. रसायनमुक्त पिकवण्याच्या अनेक पद्धती आहे जसे कि सेंद्रिय शेती, विषमुक्त, रसायनमुक्त शेती, बायोडायनामिक शेती इ. नावं जरी वेगळी वाटत असली तरी आपल्याला शेवटी रसायनमुक्त मिळणे महत्वाचे.

यातील आपण सेंद्रिय शेतीबद्दल सविस्तर पाहणार आहोत. सेंद्रिय शेती म्हणजे काय? तर सेंद्रिय शेती म्हणजे जैविक, नैसर्गिक साधनांचा वापर करून शेतावरच औषधे, खते तयार करून कीड, रोग नियंत्रीत करणे व पारंपारिक (देशी वाण) वाणांचा वापर करून, पर्यावरणाचे जतन करून केलेली विषमुक्त व रसायनमुक्त शेती म्हणजे सेंद्रिय शेती.

आपण म्हणतोय कि सेंद्रिय शेती केली पाहिजे, विषमुक्त खाल्ल पाहिजे. मग हे का उगवलं जात नाही? सेंद्रिय उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला काय अडचणी येतात? या सर्व गोष्टींचा पुरेपूर अभ्यास करणेही तितकेच महत्वाचे आहे. कारण सेंद्रिय शेती करत असताना शेतकऱ्याला त्याच्या पातळीवर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. यात पहिली आणि महत्वाची अडचण अशी कि सेंद्रिय मालाला वेळेत योग्य बाजारभाव मिळत नाही. दुसरी अडचण सेंद्रिय शेतीसाठी लागणारे योग्य, प्रमाणित तंत्रज्ञान मिळत नाही. तिसरी अडचण म्हणजे सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रमाणित निविष्ठा वेळेत आणि पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. सेंद्रिय निविष्ठांच्या किंमती परवडत नाहीत इ.

सेंद्रिय शेतीत नियमित शेतीपेक्षा उत्पादन कमी मिळते, तंत्रज्ञान नाही, बाजारभाव नाही असे आपण म्हणत असतो. परंतु आपण सेंद्रिय शेती केली आहे का? उत्पादन कमी किंवा जास्त आले हे पडताळून पाहिले का? आपल्याला सेंद्रिय शेतीची किती माहिती आहे? बाजारपेठांचा अभ्यास केला आहे का? निविष्ठा मिळतात कि नाही याची चौकशी कधी केली का? कि उगाच चार लोकं म्हणतात म्हणून आपण पण म्हणायचं याला काहीही अर्थ नाही. वरील सर्व प्रश्नांची उत्तरं आपल्याकडे हो अशी असतील तर आणि तरच आपण अभिमानाने सांगू शकता कि सेंद्रिय शेती फायद्याची आणि परवडणारी आहे.

सेंद्रिय शेती कशी करायची? सुरुवातीला अनेक अडचणी येतात. सेंद्रिय शेती रुपांतरणाचा कालावधी हंगामी पिकांसाठी २४ महिन्याचा तर वार्षिक पिकांसाठी ३६ महिन्यांचा असतो. रासायनिक शेती करताना काय वापरावे लागते हे शेतकऱ्याला अगदी तोंडपाठ असते कारण तो वर्षानुवर्षे तेच करत आलाय. परंतु सेंद्रिय शेती करताना काय वापरावे, किती प्रमाणात, कोणत्या वेळी वापरावे व काय वापरू नये या सर्व गोष्टी सुरुवातीला माहिती करून घेणे फार महत्वाचे असते.

सेंद्रिय शेतीचा महत्वाचा भाग म्हणजे लागणाऱ्या सर्व निविष्ठा या शेतातच तयार कराव्या लागतात व त्यासाठी लागणारे स्रोतहि शेतातीलच असावेत. त्यासाठी एकत्रित शेती करणे गरजेचे असते. ज्यामध्ये शेतीसोबत पशुपालन, शेळीपालन, कुक्कुटपालन, रेशीमशेती, मत्स्यपालन यातील शक्य तेवढ्या प्रकारांचा समावेश करता येतो. निविष्ठांचा खर्च इथे कमी करता येतो.

(संपर्क: +९१ ९१३०५०३०४५)

★ ★ ★